# महाराष्ट्र शासन
# वनविभाग
# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) ,गडचिरोली

---------------------------

**जाहिरात क्र.कक्ष-१(३)/आस्था/गड/१४-१५/१९६५ दि.११.८.२०१४**

## वनरक्षक पदांची भरती

मुख्यवनसंरक्षक, प्रादेशिक, गडचिरोली यांचे अखत्यारीतील गडचिरोली जिल्हयात विखुरलेल्या व दुर्गम भागात असलेल्या विभाग व परिक्षेत्रामध्ये रिक्त असलेल्या गट-क संवर्गातील **वनरक्षक** पदांची भरती करण्यांत येणार आहे. **निवड प्रक्रियेद्वारे भरती केलेल्या उमेदवारांना गडचिरोली जिल्हयातच नोकरी करणे बंधनकारक राहील. त्यांची अन्यत्र बदली होणार नाही.** कर्तव्याचा भाग म्हणून निवड केलेल्या उमेदवारांना गडचिरोली जिल्हयामध्ये विखुरलेल्या स्वरुपात दुर्गम व जंगल क्षेत्रामध्ये असलेल्या कामाचे ठिकाणी मुक्कामी राहून कामे करावी लागणार आहेत त्याच बरोबर सातत्याने प्रवास करावा लागणार आहे.

गडचिरोली वनवृत्तातील **वनरक्षक** पदासाठी पात्र उमेदवारांकडून **ऑनलाईन (online)** पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सुचना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीतील महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादीत (एमकेसीएल) या संस्थेच्या http://forest.erecruitment.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. विहित केलेले नमुना अर्ज संकेत स्थळावर उपलब्ध आहे. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने संपूर्ण जाहिरात व अनुषंगिक सुचना काळजीपूर्वक वाचावी.

उपरोक्त संवर्गातील रिक्त पदसंख्या, त्या पदाकरिता विहित केलेली वेतनश्रेणी / शैक्षणिक अर्हता अनुभव / शारीरिक पात्रता / वयोमर्यादा इत्यादिचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**पदांचा तपशील :-**

**वर्ष २०१४**

| विभाग / कार्यालयाचे नांव | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | विमाप्र | शै.सा.मा.प्र. (ESBC) | वि.मा.प्र.-अ (SBC-A) | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ८ | ९ | | १० | ११ |
| **मुख्य वनसंरक्षक (प्रा),गडचिरोली** | ८ | १० | १ | ३ | १ | १ | ३ | १ | ३० | ५८ |

**वरील उल्लेखित पदांकरिता आरक्षणापैकी पदनिहाय समांतर आरक्षण खालील प्रमाणे आहे.**

| विशेष/समांतर आरक्षण | अ.जा | अ.ज | वि.जा (अ) | भ.ज (ब) | भ.ज (क) | विमाप्र | शै.सा.मा.प्र. (ESBC) | वि.मा.प्र.-अ (SBC-A) | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १.महिला ३०% | २ | २ | ० | १ | १ | ० | १ | ० | ९ | १६ |
| २.प्रकल्पग्रस्त / धरणग्रस्त ५% | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ३ |
| ३.भुकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ४.माजी सैनिक १५% | २ | ४ | ० | १ | ० | ० | ० | ० | ५ | १२ |
| ५.अति उच्च, गुणवत्ताधारक खेळाडू ५% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ३ |
| ६.पदवीधर/पदवीधारक अंशकालीन १०% | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ५ |
| ७.वनविभागातील रोजंदारी मजुर १०% | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ५ |
| ८.होमगार्ड ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ३ |
| ९.सर्वसाधारण | १ | १ | १ | १ | ० | १ | २ | १ | २ | १० |
| **एकूण** | **८** | **१०** | **१** | **३** | **१** | **१** | **३** | **१** | **३०** | **५८** |

**विशेष टिप** - १) जाहिरातीत नमूद केलेल्या पदसंख्या दिनांक ३१ डिसेंबर २०१५ पर्यंत रिक्त होणा-या पदावर आधारीत असल्याने सदर नियुक्ती या रिक्त पदाच्या उपलब्धतेवर अवलंबून राहील. तसेच जाहिरातीत उल्लेख केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२) शासनाचे दिनांक २४ जुलै,२०१४ चे निर्णयानुसार नव्याने लागु केलेल्या आरक्षणाचे अनुषंगाने सहा. आयुक्त, मागासवर्ग कक्ष, नागपुर विभाग यांचेकडून बिंदु नामावली प्रमाणीत होण्याच्या अधिन वरील रिक्त व अनुशेषाची पदांच्या संख्येत बदल संभावित राहील.

३) महाराष्ट्र शासन अध्यादेश क्र.१३ दि.९ जुलै,२०१४ अन्वये शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग (ESBC) करिता सरळसेवा भरतीसाठी १६% आरक्षण विहीत केले आहे. सदरचे आरक्षण उन्नत व प्रगत (क्रिमीलेअर)घटकांना लागु होणार नाही.

४) महाराष्ट्र शासन अध्यादेश क्र.१४ दि.९ जुलै,२०१४ अन्वये विशेष मागास प्रवर्ग-अ (SBC-A) करिता सरळसेवा भरतीसाठी ५% आरक्षण विहीत केले आहे. सदर आरक्षण शासनाचे दि.१९.७.२०१४ चे शासन निर्णयासोबतच्या अनुसुचित यादीनुसार ५० मागास नॉनक्रिमिलियर घटकांसाठी लागु राहील. उन्नत व प्रगत (क्रिमीलेअर)घटकांना लागु होणार नाही.

१. **वेतनश्रेणी :-** (रु.५२०० - रु.२०२००, ग्रेड पे - रु.१८००)

२. **शैक्षणिक पात्रता :-** ज्यांनी उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा गणित विषयासह किंवा विज्ञान व गणित या विषयासह उत्तीर्ण केली आहे.

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.एसएससी-२००५/(१४९/०५)/उमाशि-२, दि.२०/६/२००५ अन्वये इ. १०वी, ११वी व १२वी च्या परिक्षेशी समकक्ष परिक्षांची यादी प्रसिध्द करण्यात आलेली असून, सदर शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे पत्र क्र.एसएससी-२०१०/ (६६/१०)/उमाशि-२, दि.२९/४/२०१० अन्वये सदर शासन निर्णयाचा विभागांना / कार्यालयांना वेळोवेळी उपयोग व्हावा या करीता तो महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्यांचा संगणक संकेतांक क्रमांक २०१००४२९१७०९४६००१ असा आहे.

जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अमरावती / नागपूर यांनी असे स्पष्ट केले आहे की, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.आरटीए-१०८२-२३२७-सीआर-६३-१६-अ, दि.५ ऑक्टोबर, १९८९ नुसार एसएससी पास माजी सैनिकांना ज्यांची सैन्य सेवा १५ वर्ष झालेली आहे, त्यांना ज्या पदासाठी

**पदवी ही पात्रता आवश्यक आहे, त्या ठिकाणी ग्राहय धरण्यात येते. वनविभागाव्दारे करण्यात येत असलेल्या वनरक्षकांच्या पदांच्या भरतीमध्ये ज्याकरीता १२ वी ही शैक्षणिक अर्हता आवश्यक आहे, त्याकरीता एसएससी पास आणि कमीत कमी १५ वर्ष सैन्य सेवा झालेल्या व ज्यांच्या जवळ सैन्यसेवेतील पदवी प्रमाणपत्र आहे, असे माजी सैनिकांना वनरक्षक पदासाठी पात्र ठरविण्यात येतील.**

**विविध शासकीय कार्यालयाव्दारे वेगवेगळया पदांच्या भरतीसाठी ज्याकरीता शैक्षणिक पात्रता ही १२ वी पास असते, त्याकरीता सैन्य सेवेतील पदवी ही ग्राहय धरण्यात येत असते. म्हणून जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचेव्दारे दिलेल्या खुलाशानुसार अटी व शर्ती पुर्ण करणारे माजी सैनिकांना माजी सैनिक या समांतर आरक्षणाचे पदाकरीता अन्य आवश्यक अटी व शर्तीचे अधिन राहून शैक्षणिक पात्रतेचे दृष्टिने पात्र ठरविण्यात येतील.**

**१)** शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या उमेदवारांना खाली नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक पात्रतेमध्ये सुट देण्यात येईल.

अनुसूचीत जमाती प्रवर्गातील उमेदवार, नक्षलवाद्यांच्या हल्यात मरण पावलेले किंवा गंभीररित्या जखमी झालेले वनखबरे व वनकर्मचा-यांच्या मुलांनी माध्यमिक शालांत परीक्षा उत्तिर्ण केली असल्यास (इयत्ता १० वी) या पदासाठी पात्र ठरविण्यात येईल.

टिप :- **नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मरण पावलेले किंवा गंभीररित्या जखमी झालेले वनखबरे व वनकर्मचा-यांचे संबंधात वरील प्रयोजनाकरीता शासकीय वैद्यकिय अधिकारी आणि पोलीस खात्यातील घटनेच्या कार्यक्षेत्रातील सक्षम पोलीस अधिकारी यांचेकडून निर्गमीत केलेले प्रमाणपत्र विचारार्थ घेण्यात येईल.**

**३ वयोमर्यादा :-** उमेदवाराचे वय **दि.३१,जुलै, २०१४** रोजी किमान १८ वर्षापेक्षा कमी व कमाल २५ वर्षापेक्षा जास्त नसावे. (उमेदवार दि.३१.७.१९८९ पुर्वी व ३१.७.१९९६ नंतर जन्म झालेला नसावा.)

**३.१ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम.**

(एक) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत.

(दोन) **महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शुध्दीपत्रक क्र.मासैक-१०-१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि.२० ऑगष्ट, २०१० अन्वये "माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसाठी नेमणुकीकरीता विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील."**

(तीन) पात्र खेळाडुच्या बाबत ५ वर्षापर्यंत

(चार) प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांच्या बाबतीत खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरिता तसेच मागासवर्गीय उमेदवाराकरिता सरसकट कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहील. सुशिक्षित बेरोजगार व अंशकालीन उमेदवारांकरीता सरसकट कमाल वयोमर्यादा ४६ वर्ष राहील.

(पाच) वनविभागातील शासन सेवेत कायम केलेल्या अधिसंख्य वनमजूरांना महसूल व वनविभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक एलएबी १०९४/ प्र.क्र.२५२/फ-९, दिनांक ३१-७-२००३ नुसार वयोमर्यादेसंबंधी अट शिथिलक्षम.तथापि त्यांचेसाठी राखीव जागा नाहीत याची नोंद घ्यावी.

**(सहा) वनविभागातील रोजंदारी मजुरांकरीता ४६ वर्षापर्यंत (महसुल व वनविभाग शासन निर्णय क्र. बैठक-२०१०/प्र.क्र.७/फ-९ दिनांक १६ ऑक्टोबर २०१२ नुसार)**

## ३.०२ वनरक्षक पदासाठी शारीरिक पात्रता.

| शारीरीक माप | उमेदवाराचा प्रवर्ग | |
|---|---|---|
| | पुरुष | स्त्री |
| उंची (से.मी. मध्ये ) | १६३ | १५० |
| छातीचा घेर --<br>न फुगवता (से.मी. मध्ये )<br>फुगवून (से.मी. मध्ये) | <br>७९<br>८४ | <br>--<br>-- |
| वजन (कि.ग्र.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |
| (अनुसूचित जमाती मधील उमेदवारासाठी खालील प्रमाणे शिथिलक्षम) | | |
| उंची (से.मी. मध्ये) | १५२.५ | १४५ |
| छातीचा घेर --<br>न फुगवता (से.मी. मध्ये )<br>फुगवून (से.मी. मध्ये) | <br>७९<br>८४ | <br>--<br>-- |
| वजन (कि.ग्र.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |

(चार) दूर दृष्टी आणि जवळील दृष्टीचे चष्मे व विना चष्म्याचे खालील मानक पूर्ण करतात.

**<u>दूरदृष्टी</u>**

| अधिक चांगला डोळा | वाईट डोळा (सुधारलेली दृष्टी) |
|---|---|
| ६/६ | ६/१२ |
| किंवा | किंवा |
| ६/९ | ६/९ |

**<u>जवळील दृष्टी</u>**

| अधिक चांगला डोळा | वाईट डोळा |
|---|---|
| J.१ | J.११ |

प्रत्येक डोळा संपूर्ण क्षेत्र दृष्टीयुक्त असणे आवश्यक आहे.

(ब) शासकीय वैद्यकीय अधिकारी किंवा वैद्यकीय तपासणी संदर्भात प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय विशेषज्ञांकडून वैद्यकीय पात्रता प्रमाणित करण्यात येईल. वैद्यकीय चाचणीमध्ये तिरळेपणा, रंग व रात आंधळेपणा, आतल्या बाजूला फेंगाडे असलेले गुडघे, सपाट पाय, त्वचा व छातीचे रोग या संबंधीचा आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), म.रा.नागपुर यांनी वेळोवेळी विहित केलेल्या अन्य वैद्यकीय चाचणीचा समावेश राहील.

(क) शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या उमेदवारांना खाली नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रतेमध्ये सुट देण्यात येईल.

नक्षलवाद्यांच्या हल्यात मरण पावलेल्या किंवा गंभीररित्या जखमी झालेल्या वनखबरे व वनकर्मचा-यांचे मुलांना खाली नमूद केल्याप्रमाणे सूट देण्यात येईल.

१) उंची :- पुरूष आणि स्त्री उमेदवारासाठी २.५ से.मी.
२) छाती :- मोजणी आवश्यक नाही.

(ड) **खेळाडू प्रवर्ग :-** विहित शैक्षणिक अर्हता धारण करणा-या व वयोमर्यादेची अट पूर्ण करणा-या खेळाडूंना, विहित उंचीमध्ये २.५ से.मी. इतकी सवलत देण्यात येईल.

(इ) **वनकर्मचा-यांचे पाल्यांना शारीरिक अर्हतेत सवलतः-** सेवेत कार्यरत असतांना मृत्यू पावलेल्या वनकर्मचा-यांच्या एका मुलास किंवा मुलीस शारीरिक पात्रतेत खालील प्रमाणे सवलत देण्यात येईल.

(ए) उंची :- पुरुष आणि स्त्री उमेदवारास २.५ से.मी.
(बी) छाती :- पुरुष उमेदवारांना २.० से.मी. न फुगवता व १.५ से.मी.फुगवून.

(फ) **किमान सापेक्ष ऊंची, वजन व छातीची मोपमापे :-**
**शासन पत्र क्रमांक एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-४, दि.२४/८/२०११**

**उपरोक्त शासन पत्रातील निर्देशानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम-१९८१ मधील परिशिष्ट-३ मध्ये महाराष्ट्र वनसेवेंतर्गत निवड करण्यात आलेल्या उमेदवारांसाठी विहीत केलेल्या ऊंची व वजनाच्या तक्त्याप्रमाणे वनरक्षक या पदासाठीही उंचीच्या प्रमाणात वजन आवश्यक राहील. वैद्यकिय तपासणी करणा-या व्यक्तींच्या मार्गदर्शनाकरीता सर्वसाधारण नियमानुसार पुरेशी मानली जाणारी किमान सापेक्ष उंची, वजन व छातीची मोजमापे दर्शविणारा तक्ता नमुद आहे. त्याप्रमाणे कार्यवाही होईल.**

## ४. निवड पध्दत :-

४.१ उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा व त्याची गडचिरोली जिल्हयातील आदिवासी दुर्गम/नक्षलग्रस्त भागात काम करण्याची तयारी असावी.(अधिवास प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.)

४.२ वनरक्षक पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवार किमान शारीरीक पात्रता धारण करतात किंवा कसे हे निश्चित करण्याच्या दृष्टीने उमेदवारांची मोजमापे स्थानिक शासकीय वैद्यकिय अधिकारी यांच्या उपस्थितीत घेण्यात येतील.

४.३ जे उमेदवार शारिरीक क्षमता चाचणी विहीत वेळेत पुर्ण करतील त्यामधुन सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेवून स्पर्धात्मक वेळेनुसार किमान शैक्षणिक पात्रता,वयोमर्यादेची अट तसेच किमान शारीरिक पात्रता धारण करतात त्या पात्र उमेदवारांची खालीलप्रमाणे शारीरिक पात्रता मोजणीकरिता निवड करण्यात येईल.

बहुतांश वनक्षेत्र हे भौगोलीक दृष्टया दुर्गम क्षेत्रात अस्तित्वात आहे. वनरक्षक हे वनविभागातील क्षेत्रीय स्तरावरील आघाडीवरील पद **(Frontline Staff)** असून वनरक्षकाने वनसंरक्षणाच्या दृष्टिने वनक्षेत्रात पायी फिरून गस्त घालणे आवश्यक असते.त्यामुळे वनरक्षक या

पदासाठी पुरुष उमेदवारांना २५ कि.मी.चालणे व महिला उमेदवारांना १६ कि.मी.चालणे अशी शारिरीक क्षमता चाचणी विहित करण्यात येत आहे.

**त्यामुळे शारीरीकदृष्टया सक्षम उमेदवारांची प्राधान्याने निवड करण्याच्या दृष्टीने विहित केलेले शारीरीक मोजमाप व धावण्यांची चाळणी चाचणी घेण्यांत येईल. यासाठी शारीरिक दृष्टया सुदृढ असल्याबाबत शासकिय वैद्यकिय अधिका-यांकडून ओळखपत्रामध्ये नमूद केलेल्या प्रपत्रात प्रमाणपत्र प्राप्त करावे. त्याशिवाय शारिरिक तपासणी करीता पात्र ठरविण्यांत येणार नाही. सदरचे ओळखपत्र एमकेसीएल च्या http://forest.erecruitment.co.in या संकेतस्थळावरुन दोन प्रतीत डाऊनलोड करावे व एक प्रत शारिरिक मोजमाप तपासणीचे वेळेस सादर करावी.**

**परिच्छेद ३.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शारिरिक मोजमापानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची शारीरीक क्षमता चाळणी चाचणी घेण्यात येईल. त्यानंतर पात्र उमेदवारांना धावण्यांची चाळणी चाचणी पुरुष उमेदवारांनी ५ कि.मी. व महिला उमेदवारांनी ३ कि.मी.जास्तीत जास्त ३० मिनीटामध्ये पूर्ण करणे आवश्यक राहील. ही चाळणी चाचणी स्पर्धात्मक स्वरुपाची व बाद पध्दतीची असेल. यामध्ये प्रथम येणारे पदसंख्येच्या ३ पट एवढे उमेदवार पुढील फेरीसाठी पात्र ठरविण्यात येतील. ३ पटीपेक्षा जास्त उमेदवार पुढील फेरीसाठी निवड करण्याचे अधिकार निवड समितीकडे राहतील.उमेदवारांची संख्या निश्चित करतांना विहित करण्यात आलेले आरक्षणही विचारात घेण्यात येईल.**

४.४ (i) वरील प्रमाणे पुढील फेरीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचे इयत्ता १२ मधील (उच्च माध्यमिक शालांत परिक्षा) व

(ii) शासनाव्दारे घोषित नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार, नक्षलवादयांच्या हल्ल्यात मृत्यू व जखमी झालेले असे वनखबरे व अशा वनकर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी इयत्ता १० मधील (माध्यमिक शालांत परिक्षा) एकूण गुण विचारात घेवून गुणानुक्रम निश्चित करण्यात येईल. इयत्ता १० वी / १२ वी मधील गुणांना ८७.५ % एवढे भारांकन **(Weightage)** देण्यात येईल. (टीप :- १० वी १२ वी /तत्सम समकक्ष परिक्षेत एकापेक्षा जास्त संधीत उत्तीर्ण झाले असेल तर त्या प्रत्येक परीक्षेचे गुणपत्रक (मार्कलिस्ट) निवड चाचणीच्या वेळी समक्ष आणणे आवश्यक आहे अशी सर्व गुणपत्रके न आणल्यास असा उमेदवार अपात्र समजला जाईल.)

**<u>गुणवत्ता यादी खालील पध्दतीने तयार करण्यात येईल.</u>**

४.५ गुणवत्ता यादी तयार करतांना इयत्ता १२ वी मधील व नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार, नक्षलवादयांच्या हल्ल्यात मृत्यू व जखमी झालेले असे वनखबरे व वन कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी इयत्ता १० वी मधील (माध्यमिक शालांत परिक्षा) गुणांच्या टक्केवारीचे ८७.५% भारांकन देण्यात येईल.

४.६ धावण्याच्या चाचणी परीक्षेमध्ये १२.५% भारांकन देण्यात येईल. धावण्याच्या चाचणी परिक्षेकरिता खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील.

१.पहिल्या येणा-या ३ उमेदवारास (अ.क्र.१ ते ३) प्रत्येकी - १० गुण
२.त्यानंतर येणा-या ५ उमेदवारास (अ.क्र.४ ते ८) प्रत्येकी - ८ गुण
३.त्यानंतर येणा-या ७ उमेदवारास (अ.क्र.९ ते १५) प्रत्येकी - ६ गुण
४.त्यानंतर येणा-या १०उमेदवारास (अ.क्र.१६ते२५) प्रत्येकी - ४ गुण
५.त्यानंतर येणा-या १५उमेदवारास (अ.क्र.२६ते४०) प्रत्येकी -२.५ गुण
६.४० व्या क्रमांकानंतर येणा-या उमेदवारास - प्रत्येकी ० गुण

४.७ वरीलप्रमाणे इयत्ता १० वी /१२ वी शैक्षणिक अर्हता परिक्षेमधील प्राप्त गुणांच्या टक्केवारीचे ८७.५% केलेले भारांकन व १२.५% भारांकन करीता धावण्याच्या चाचणी परिक्षेमध्ये प्राप्त केलेले गुण यांची बेरीज करुन उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. त्या आधारे आरक्षणनिहाय असलेली रिक्त पदे विचारात घेवून अंतीम निवड यादी तयार करण्यात येईल.

उदाहरणार्थ :- श्री."क"या उमेदवाराने शैक्षणिक अर्हता परिक्षा (उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा विज्ञान) मध्ये एकुण निर्धारित ५०० गुणांपैकी ३०० गुण प्राप्त केले आहेत त्याची टक्केवारी ६०% येईल, त्यांचे ८७.५% भारांकन म्हणजे ५२.५० ऐवढे येईल. तसेच ५ कि.मी./३ कि.मी. धावण्याच्या चाचणी परिक्षेत समजा तो ७ व्या क्रमांकावर आलेला आहे, तर उर्वरित १२.५% भारांकन करिता त्यांना दिनांक २१.७.२०१४ च्या शासन पत्रानुसार १२.५ पैकी ८ गुण मिळतील. या प्रमाणे गुणवत्ता यादीकरिता त्यांना मिळणारे गुण = ५२.५०+८= ६०.५०% अशा प्रकारे गणना केली जाईल.

४.८ गुणवत्ताधारक उमेदवाराची निवडसुची तयार करणेपूर्वी शासन निर्णय क्रमांक एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-४, दि.३० जुलै, २०११ अन्वये २५ कि.मी.पुरुष उमेदवारांसाठी तर १६ कि.मी. स्त्री उमेदवारांसाठी चालण्याची शारिरिक क्षमता चाचणी घेण्यात येईल. उपरोक्त चाचणी ही चार तासांमध्ये पुर्ण करणे बंधनकारक राहील.

## निवड प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ.क्र. | टप्पा | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | दिनांक १०.९.२०१४ |
| २ | प्राप्त अर्जाची तपासणी पुर्ण करण्याची अंतीम तारीख | दिनांक १७.९.२०१४ |
| ३ | प्राप्त अर्जाची छाननी नंतर पात्र उमेदवारांची नांवे व त्यांचे शारीरिक पात्रता तपासणी व प्रथम धावण्याची चाचणी कार्यक्रम प्रसिध्द करणे | दिनांक २२.९.२०१४ |
| ४ | उमेदवारांची शारीरीक पात्रता तपासणे.(ऊंची व छातीचे माप ठरवून दिलेल्या मापदंडानुसार तपासणे) | दिनांक २९.९.२०१४ ते १.१०.२०१४ |
| ५ | वनरक्षक पदासाठी पात्र उमेदवारांची प्रथम (५ कि.मी./३ कि.मी.) धावण्याची चाळणी चाचणी घेणे. | |
| ६ | प्रथम धावण्याची चाळणी चाचणी नंतर पात्र झालेले उमेदवारांची यादी तसेच प्रमाणपत्र तपासणी कार्यक्रम प्रसिध्द करणे | दिनांक ८.१०.२०१४ |
| ७ | प्रथम धावण्याची चाळणी चाचणीनंतर पात्र झालेले उमेदवारांची प्रमाणपत्रांची तपासणी | दिनांक १३.१०.२०१४ ते १४.१०.२०१४ |
| ८ | प्रमाणपत्र तपासणीनंतर पात्र झालेले उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे, तसेच त्यांची शारीरीक क्षमता चाचणी (चार तासात २५ कि.मी./१६ कि.मी. चालणे) करीता कार्यक्रम प्रसिध्द करणे | दिनांक १७.१०.२०१४ |
| ९ | पात्र उमेदवारांची चार तासात २५ कि.मी.१६ कि.मी. चालण्याची चाचणी | दिनांक २०.१०.२०१४ ते २२.१०.२०१४ |
| १० | निवड यादी तयार करुन जाहीर करणे (उमेदवारांची शैक्षणिक परिक्षेमध्ये प्राप्त गुणांचे ८७.५% भारांकन +५ कि.मी./३ कि.मी.मध्ये मिळालेले गुणांची बेरीज) | दिनांक २९.१०.२०१४ |
| ११ | i) नियुक्ती आदेश देण्यापूर्वी वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र सादर करणे बाबत पत्र देण्याची तारीख<br>ii) वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र सादर करण्याची तारीख | दिनांक १.११.२०१४<br>दिनांक १७.११.२०१४ |
| १२ | सक्षम प्राधिकारी यांनी नेमणूकीचे आदेश देण्याची तारीख | दिनांक १८.११.२०१४ |

11. (i) शारीरीक पात्रता तपासणीचे स्थळ आणि वेळ. :- नोटीस बोर्डावर वेळोवेळी प्रकाशित करण्यात येईल.
(ii) शारीरीक क्षमता चाचणीचे स्थळ आणि वेळ. :
iii) धावण्याच्या चाचणीचे स्थळ आणि वेळ. :-

निवड प्रक्रियेच्या वेळापत्रकात काही बदल झाल्यास याबाबत सुचना वेळोवेळी **http://forest.erecruitment.co.in** तसेच www.mahaforest.nic.in या संकेतस्थळावर देणेत येईल.

(टिप :- खालील माहिती **http://forest.erecruitment.co.in** व www.mahaforest.nic.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द केली जाईल. याबाबत वेगळयाने पत्रव्यवहार केला जाणार नाही.)

१) उमेदवार हा शारीरिक क्षमता चाचणीकरीता शारीरिक दृष्टया सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित उमेदवारांनी शासकीय वैद्यकीय अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेवून धावण्याच्या चाळणी परिक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

२) शारीरिक तपासणीचा कार्यक्रम

३) पुरुष उमेदवारांकरिता ५ कि.मी. व स्त्री उमेदवारांकरिता ३ कि.मी. धावण्याच्या कार्यक्रमाचे नियोजन या वनवृत्तातील विभागीय स्तरावर आयोजित केले जाईल. याबाबतची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल.

४) उमेदवाराचे धावण्याच्या चाचणीतील वेळ इ.माहिती

५) चालण्याच्या चाचणीनंतर पात्र /अपात्र उमेदवारांची यादी

६) वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणा-या भरती प्रक्रियेबाबतच्या सुचना

## ५. सर्वसाधारण अटी :-

५.१. सेवाप्रवेश नियमातील अटीनुसार संबंधित संवर्गातील उमेदवारांना मराठी भाषा वाचता, लिहिता व बोलता येणे आवश्यक आहे.

५.२ उमेदवार महाराष्ट्र राज्याचा कायमचा रहिवासी असावा.

५.३ "महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक भुकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/ १६-अ, दिनांक २७/८/२००९ अन्वये प्रकल्पग्रस्तांना असलेले ५ % समांतर आरक्षण त्यांचेसाठीच राखून ठेवून आरक्षणाअंतर्गत भुकंपग्रस्तांसाठी ठेवलेले आरक्षण काढून भुकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे २ % समांतर आरक्षण लागू राहील"

५.४ सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८१/१३-अ दिनांक १६/३/१९९९ अन्वये समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्याने सामाजिक आरक्षणाच्या प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा.,अ.ज., वि.ज.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व.,शै.सा.मा.प्र.,वि.मा.प्र.-अ आणि इतर प्रवर्ग) विशेष आरक्षणानुसार होणा-या राखीव पदांची संख्या, पदाचा तपशिल या शिर्षांतर्गत दर्शविण्यात आलेला आहे. समांतर आरक्षणाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास सर्व समांतर पदे त्या त्या सामाजिक प्रवर्गातुन भरण्यात येईल.

५.५ वि.जा.(अ), भ.ज. (ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प., इ.मा.व., शै.सा.मा.प्र.,वि.मा.प्र.-अ या प्रवर्गातील उमेदवारासाठी शासन परिपत्रक सामान्य न्याय, सांस्कृतीक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सी.बी.सी-१०/२००६/ प्र.क्र.१५/मावक-५ दिनांक ३०/६/२००६ सोबतच्या सुधारित नमुण्यात त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे

(दि.३१.३.२०१५ पर्यत वैध असलेले) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर सुधारित प्रमाणपत्र अर्जासोबत जोडले नसल्यास अर्ज नाकारण्यात येईल.

खुल्या प्रवर्गातील व मागासप्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड), शै.सा.मा.प्र.,वि.मा.प्र-अ या प्रवर्गातील महिलासाठी असलेले ३० टक्के आरक्षण उन्नत व प्रगत व्यक्ति / गटातील (क्रिमीलेअर) कुटुंबातील महिला सदस्यांना अनुज्ञेय राहणार नाही.

५.६ महिला आरक्षणा करिता अर्ज करतांना खुल्या प्रवर्गातील व मागास प्रवर्गातील इतर मागास वर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड),शै.सा.मा.प्र., वि.मा.प्र.-अ या प्रवर्गातील महिला उमेदवारानी त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे(दि.३१.३.२०१५ पर्यत वैध असलेले) सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

५.७ खुल्या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती / कुटूंबातील (क्रिमीलेअर) खेळाडू उमेदवारांना खेळाडूसाठी असलेले आरक्षण अनुज्ञेय असणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड), शै.सा.मा.प्र., वि.मा.प्र.-अ या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती अथवा गटातील खेळाडू सदस्यांना खेळाडुचे ५% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

५.८ रोजगार कार्यालय, जिल्हा समाज कल्याण कार्यालय,आदिवासी प्रकल्प अधिकारी,प्रकल्पग्रस्त,भुकंपग्रस्त उमेदवारासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, सैनिक कल्याण कार्यालय इत्यादि कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी देखील ऑनलाईन अर्ज सादर करावा.

५.९ वनविभागात कार्यरत असलेल्या रोजंदारी/ अधिसंख्य वनमजूरानी ते ज्या पदाची पात्रता धारण करीत आहेत त्या पदाकरिता विहित केलेल्या पध्दती प्रमाणे ऑनलाईन अर्ज सादर करु शकतील.त्यापैकी फक्त रोजंदारी मजूर समांतर आरक्षणाअंतर्गत राखीव जागासाठी पात्र असतील.

५.१० अनुभवाच्या बाबतीत तासीका, नियत कालीक, अंशकालिक, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्मक, विद्यावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही.

५.११ पडताळणी अंती अर्ज रद्द ठरविणे, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करणे, उमेदवारांची अंतिम निवड करणे, जाहिरातीचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे या बाबतचे संपुर्ण अधिकार निवड समितीने राखुन ठेवले आहे.

५.१२ सेवाशर्तीनुसार अपात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वगळण्यात येईल.

५.१३ उमेदवारांना शारिरीक क्षमताचाचणी परिक्षा व मुलाखती करिता कोणत्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

५.१४ वनविभागातील वनरक्षक या पदावर नियुक्ती करतांना एकूण ५ % पदे होमगार्डस मध्ये कमीत कमी ३ वर्षे इतकी सेवा झालेल्या व वनरक्षक पदासाठी आवश्यक शैक्षणिक / शारिरीक पात्रता पुर्ण करणा-या विहीत वयोमर्यादेतील तसेच विहीत पात्रता परिक्षा उत्तीर्ण होणा-या होमगार्डस मधून भरण्यात येतील.

५.१५ "सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य' या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदविधर /

पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय / निमशासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी १० % समांतर आरक्षण लागू करण्यात येत आहे व त्यांना सध्याच्या ४५ वर्षे मर्यादेत आणखी १ वर्षाने वाढ करून सदर सवलत ४६ वर्षापर्यंत देण्यात येईल."

५.१६ वनविभागात रोजंदारीवर मजुरांनी सलग किंवा तुटकतुटक प्रत्येक वर्षी किमान २४० दिवस सतत ५ वर्ष पुर्ण करणारे रोंजदारी मजूर महसूल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक बैठक-२०१०/प्र.क्र.७/फ-९ दि.१६ ऑक्टोंबर २०१२ नुसार १० टक्के आरक्षणासाठी पात्र आहेत व अशा उमेदवाराकरिता ४६ वर्षापर्यत वयोमर्यादेत सुट देण्यात आली आहे. सदर सवलतीसाठी उमेदवारांनी संबधित उपवनसंरक्षक यांचे प्रमाणपत्र सादर करावे. प्रमाणपत्रामध्ये जेष्ठतायादीतील अनुक्रमांक नमुद असणे व अर्जाचे तारखेस उमेदवार वनविभागात कार्यरत असल्याचे नमुद असणे अनिवार्य आहे.रोजंदारी मजूरांनी महिना निहाय केलेल्या कामांचा,हजर दिवसाचा वनविभागाकडील प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

५.१७ उमेदवारांना ओळखपत्र, लहान कुटूंबासंबंधी प्रमाणपत्र (नमूना-अ), वचनपत्राचा नमूना व उमेदवारांनी स्वाक्षरी करावयाचे प्रतिज्ञापत्राचे नमूने http://forest.erecruitment.co.in तसेच www.mahaforest.nic.in या संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घ्यावे.

## ६. निवडसूचीची कालमर्यादा :

सदर जाहीरातीमध्ये दि.३१.१२.२०१५ पर्यत रिक्त होणारी पदे विचारात घेतली असल्याने,निवडसमितीने तयार केलेली निवडसुची दि.३१.१२.२०१५ पर्यत विधिग्राहय राहील.त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

निवड समितीने तयार केलेल्या निवडसूचीमधून गुणवत्ता यादीनूसार उमेदवाराची नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर हजर न झाल्यास किंवा संबधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार किवा जाती प्रमाणपत्र किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव संबधित उमेदवार पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास निवडसुचीतील अतिरीक्त उमेदवारांमधून अन्य उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल.

## ७. सेवाशुल्क :-

उमेदवाराने उपरोक्त पदासाठी आवश्यक असलेले शुल्क खालीलप्रमाणे महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादीत (एमकेसीएल) या संस्थेच्या मार्गदर्शक सुचनेमध्ये दिलेल्या पध्दतीने जवळच्या भारतीय स्टेट बॅन्क शाखेमध्ये भरणा करणे आवश्यक आहे.

| प्रवर्ग | शुल्क |
|---|---|
| खुला | रु.५०० |
| मागासवर्गीयांकरीता | रु.२५० |
| माजी सैनिक | नाही |

**महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक आरटीए-१०७९/०/४८२/ १६-अ, दिनांक ३ जुलै,१९८० मधील परिच्छेद क्रमांक २ मध्ये माजी सैनिकांना परिक्षा फी तसेच अर्जाचे फी मध्ये सुट दिलेली आहे.**

## <u>ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सुचना</u>

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यत |
| १ | अर्ज ऑनलाईन नोंद (रजीस्ट्रेशन) करण्याचा कालावधी | १६.८.२०१४ | ६.९.२०१४ |
| २ | संगणकीय चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडीया एसबीआय यांचे शाखेमध्ये फी स्विकृतीचा कालावधी | १७.८.२०१४ | ८.९.२०१४ |
| ३ | ज्या उमेदवारांनी बँकेमध्ये दि. ८.९.२०१४ पर्यत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी उरलेला ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | दि. १०.९.२०१४ रात्री २३.५९ वाजेपर्यंत | |

(उपरोक्त संवर्गातील रिक्त पदसंख्या, त्या पदाकरीता विहीत केलेली वेतनश्रेणी / शैक्षणिक अर्हता / अनुभव शारीरिक पात्रता / वयोमर्यादा इत्यादिचा तपशिल वर नमुद केलेप्रमाणे आहे.

## ८. अर्ज करण्याची पध्दत :-

**१) ऑनलाईन पध्दत <u>http://forest.erecruitment.co.in</u> अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सुचना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील महाराष्ट्र राज्य महामंडळ मर्यादित (एमकेसीएल) या संस्थेच्या <u>http://forest.erecruitment.co.in</u> या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. विहित केलेला नमुना अर्ज सदर संकेतस्थळावर उपलब्ध होईल. उमेदवार त्याचा अर्ज ऑनलाईन भरण्यासाठी एम.के.सी.एल.पुणे यांच्या अधिकृत प्रशिक्षण केंद्राची मदत व मार्गदर्शन घेवू शकतील. अधिकृत प्रशिक्षण केंद्राची (ALC-Authorised Learning Center) पत्त्यासह माहिती <u>http://forest.erecruitment.co.in</u> या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.**

**२) उमेदवाराने उपरोक्त नमुद केलेल्या संस्थेच्या वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर (website) Apply online या लिंकवर क्लिक करावे व सर्वप्रथम प्राथमिक माहिती भरावी यानंतर रजिस्टर (button) या बटनावर क्लिक करावे.**

**३) नोंदणी झाल्यानंतर उमेदवाराने अर्ज क्रमांक (Application form No.) व पासवर्ड (Password) काळजीपुर्वक स्वत:कडे पुढील प्रक्रियेसाठी जपुन ठेवावा.**

**४) त्यानंतर नोंदणी झाल्यानंतर उमेदवाराने प्रिंट चलन (print challan) या बटनावर क्लिक करुन प्रिंट करावे.**

**५) बँक चलनावर नमूद केलेली फि स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) यांच्या शाखेमध्ये जाहिरातीत दिलेल्या मुदतीचे आत कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील व त्याची एक प्रत स्वत:कडे जपून ठेवावी फि भरण्यासाठी बॅन्केने आकारलेले शुल्क उमेदवाराने बॅन्केत भरावे.**

**६) बँकेत फी भरल्यानंतर उमेदवाराने आपला उर्वरीत अर्ज एक दिवसानंतर भरावा.**

**७) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वत:चा अद्यावत (Latest) फोटो व स्वत:ची स्वाक्षरी विहित पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.**

**८) उमेदवाराने संपुर्ण अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर अर्जाची प्रिंट दोन प्रतीत काढून ती स्वत:जवळ ठेवावी व त्यापैकी एक प्रत शारिरिक तपासणीचे वेळेस ओळखपत्रासह सादर करावी.**

**९) वरील सर्व (उमेदवार नोंदणी, बँक प्रक्रिया, उर्वरित अर्ज भरणे इत्यादि) प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर उमेदवार पुढील प्रक्रियेसाठी पात्र होईल.)**

**१०) उमेदवाराच्या माहिती व मदतीकरीता एम.के.सी.एल. पुणे यांच्या कॉल सेंटरवरील दुरध्वनी क्रमांक ९३२६५५२५२५ वर उमेदवारांना योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध होईल.**

## ९. महत्वाच्या सुचना

१) पोस्टाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. ऑनलाईन अर्जाची प्रत या कार्यालयास समक्ष अथवा पोष्टाने अथवा या कार्यालयाचे वेबसाईटवर पाठवू नये.

२) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी स्वत:चा मोबाईल नंबर व ई-मेल आय-डी नोंद करतेवेळी काळजीपूर्वक भरावा.

३) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक प्रमाणपत्रे व अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही तथापी ऑनलाईन अर्जामध्ये संपुर्ण माहिती भरणे आवश्यक आहे ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहील्यास अर्ज संगणकाद्वारे स्विकारला जाणार नाही त्यामुळे उमेदवाराने अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी. अंतिम निवडपुर्व कागदपत्र तपासण्याची वेळी सदर कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

४) गुणानुक्रमे व आरक्षण विचारात घेवून पात्र झालेल्या उमेदवारांची नावे वनविभागाच्या www.mahaforest.nic.in या संकेतस्थळावर तसेच महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एमकेसीएल) या संस्थेच्या http://forest.erecruitment.co.in या संकेतस्थळावर जाहिर करण्यात येतील.

५) वनरक्षक पदासाठी धावण्याची चाळणी चाचणी ही उमेदवारांची कोणतीही कागदपत्रे तपासणी न करता घेतली जाणार असल्याने या परिक्षेत मिळालेल्या गुणांचे आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाही. कागदपत्रांच्या पुर्ण छाननीनंतर तसेच शारीरिक पात्रतेच्या पुर्ततेच्या अधीन उमेदवारांची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक /समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल.

६) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र या कार्यालयात नावनोंदणी केली असली तरी वरील पदांसाठी विहित नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक राहील.

७) अर्ज एकदा ऑनलाईन सादर केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवारांनी आवश्यक सर्व तपशिल स्वत:जवळ तयार ठेवावा व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी.

## १०. भरती बाबत अर्जदारासाठी इतर आवश्यक सूचना :-

१०.१ प्रत्येक पदासाठी स्वतंत्रपणे आवेदनपत्र भरणे आवश्यक राहील.

१०.२ निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सूचना दिली जाणार नाही.

१०.३ निवड होऊन नियुक्ती मिळालेल्या उमेदवारांना नियमानुसार प्रशिक्षण, विभागीय परीक्षा, विहित केलेल्या भाषेची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

१०.४ वनरक्षक पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांनी एका वर्षाचा वनरक्षक अभिक्रम प्रशिक्षण पाठयक्रम यशस्वीरित्या पुर्ण केल्यावर वनरक्षक पदावर त्याची नियुक्ती केली जाईल.

१०.५ आरक्षित पदांकरिता उमेदवारांनी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे वैध प्रमाणपत्र शासनाचे प्रचलित नियमानुसार विहित वेळात सादर करणे आवश्यक राहील.

१०.६ उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या संबंधात कोणत्याही प्रकारचा वशीला किंवा दबाव आणण्याचा किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविली जाईल.

१०.७ निवड झालेल्या उमेदवारांची वनवृत्ता अंतर्गत ग्रामीण व दुर्गम क्षेत्रात कोठेही नियुक्ती होऊ शकते.

१०.८ पदभरती प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारीरिकदृष्टया इजा पोहचल्यास अथवा नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

१०.९ वनरक्षक पदावर नियुक्ती केलेल्या उमेदवारांची आंतरवृत्तीय बदली होणार नाही याची नोंद संबंधित उमेदवारांनी घ्यावी.

१०.१० महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब दि.५ नोव्हेंबर २००९ मधील निर्देशानुसार मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्तीचे वेळी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१०.११ भरती बाबत वेळापत्रकातील बदल व इतर आवश्यक सुचनांसाठी वनविभागाच्या www.mahaforest.nic.in या संकेतस्थळावर तसेच महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एमकेसीएल) या संस्थेच्या http://forest.erecruitment.co.in या संकेतस्थळावर जाहिर करण्यात येतील. करिता उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळावर पाहणी करावी.

१०.१२ समान गुण प्राप्त केलेल्या उमेदवारामधील अंतर्गत गुणवत्ता बाबत मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) गडचिरोली यांचे अध्यक्षतेखालील समितीचे निर्णयानुसार गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) गडचिरोली यांचेकडे निवड प्रक्रीयेबाबत अटी/शर्ती/सुचना मध्ये बदल/सुधारणा किंवा रदद करण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात आले आहेत. त्रुटी निदर्शनास आल्यास त्याप्रमाणे वेळोवेळी सुधारित आदेश निर्गमीत करण्यात येतील.**

दिनांक : 11 ऑगस्ट, 2014

**मुख्य वनसंरक्षक**
**(प्रादेशिक) गडचिरोली**

**मुख्य वनसंरक्षक, गडचिरोली (प्रादेशिक)**

**वनरक्षक भरती प्रक्रिया २०१४**

## ओळखपत्र

| अर्जावर चिकटवलेले छायाचित्र |
|---|
| उमेदवारांची सही |

१. उमेदवार क्रमांक (I.D. No.) --------------------------

२. उमेदवाराचे संपूर्ण नांव --------------------------------

--------------------------------

३. पदाचे नांव : **वनरक्षक**

---

**प्रथम स्पर्धात्मक चाळणी चाचणीपुर्वी उमेदवार हे धावण्यासाठी शारिरीकदृष्टया सुदृढ असल्याबाबतचे वैद्यकिय प्रमाणपत्र.**

प्रमाणित करण्यात येते की, श्री / कु. ....................................................... हे पुरुषाकरीता ५ कि.मी. / स्त्रि उमेदवारांकरीता ३ कि.मी. धावण्यासाठी शारिरीकदृष्टया सुदृढ आहेत.

दिनांक :-

**शासकिय वैद्यकिय अधिकारी**

**(स्वाक्षरी शिक्क्यासह)**

**उमेदवारांनी शारीरीक पात्रता तपासणी व मुलाखतीच्या वेळी उपरोक्त नमुन्यातील ओळखपत्र व ऑनलाईन अर्जाची प्रत सोबत आणावी. सदरचे ओळखपत्र सर्व भरती प्रक्रियेसाठी आवश्यक राहील.**

# <u>लहान कुटूंबा संबंधी प्रतिज्ञापत्र</u>

## <u>नमूना - अ</u>

## <u>(नियम - ४)</u>

मी श्री / श्रीमती / कुमारी ------------------------------------------------------------------------------------

श्री ---------------------------------------------------------------------- यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय ----------

------ वर्ष, राहणार -------------------------------------------------------------------------------- याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

१) मी -------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला -------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८-३-२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------------- आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असतील तर दिनांक २८-३-२००५ वा तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे --------------------------- या पदासाठी मी अपात्र ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

दिनांक :- **अर्जदाराची स्वाक्षरी**

स्थळ :- **नांव:-**

# <u>उमेदवाराचे स्वाक्षरीत करावयाचे प्रतिज्ञापत्र</u>

प्रमाणित करतो / करते की वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे सत्य आणि बरोबर आहे. नमूद केलेल्या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता माझ्याकडे आहे याची खात्री करुनच हा अर्ज मी सादर करीत आहे.

मी आणखी असेही प्रमाणीत करतो / करते की अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास या माहितीच्या आधारे मिळालेली नोकरी गमावण्यास मी बाध्य राहील व त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

दिनांक : **अर्जदाराची सही**

ठिकाण : **नांवः-**

# <u>उमेदवाराने द्यावयाचे वचनपत्र</u>

वनरक्षक पदभरती २०१४ मध्ये मी खालील सही करणार वचनपत्र लिहून देतो / देते की, वनरक्षक पदभरती २०१४ मध्ये मी उमेदवार म्हणून आवेदनपत्र दाखल केले आहे. उपरोक्त भरती प्रक्रियेचा भाग म्हणून शारिरीक क्षमता चाळणी चाचणीमध्ये ---------------- कि.मी. (पुरूष उमेदवारास) ------------------ तासात / ------------------ कि.मी. (स्त्री उमेदवारास) ------------ तासात पुर्ण करण्याच्या चाळणी चाचणीमध्ये स्वेच्छेने सहभागी होत आहे. सदरहू चाळणी चाचणीकरीता मी शारिरीक दृष्ट्या सक्षम आहे. उपरोक्त शारिरीक क्षमता चाळणी चाचणी दरम्यान माझी शारिरीक वा कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास, त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

करिता हे वचनपत्र लिहून देण्यात येत आहे.

स्थळ : **उमेदवाराचे नांव**

ठिकाण :

दिनांक :